# वसई विरार शहर महानगरपालिका

**मा. सर्वसाधारण सभा दिनांक १७ /०१/२०१९**

**सभा सुचना क्रं. ०९ सायं ४.३० वा.**

| | विषयाचे नाव | मा. सर्वसाधारण सभेचा निर्णय |
|---|---|---|
| १. | मागील मा. सर्वसाधारण सभा दि. १९/१२/२०१८ व मागील मा.विशेष सर्वसाधारण सभा दिनांक २९/१२/२०१८ सभांचे कायम झालेले इतिवृत्त माहितीस्तव. | ठराव :- मागील मा. सर्वसाधारण सभा दि. १९/१२/२०१८ व मा. विशेष सर्वसाधारण सभा दि. २९/१२/२०१८ रोजीचे माहितीस्तव दिलेले इतिवृत्त कायम करणेंत येत आहे.<br>अनुमोदक :- (नितीन राऊत) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |
| २. | प्रश्नोत्तरे | |
| ३. | शासकीय पत्रव्यवहार माहितीस्तव. | |
| ४. | वसई विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती-सी, चंदनसार आस्थापनेवरील कर्मचारी श्रीमती. अंबा अर्जुन लाड, सफाई कामगार यांना स्वेच्छा निवृत्ती देणेबाबत. | ठराव/निर्णय :- वसई विरार शहर महानगरपालिकेतील कर्मचारी श्रीमती अंबा अर्जुन लाड, सफाई कामगार, प्रभाग समिती- सी, चंदनसार यांना दि. ३१/०१/२०१९ रोजी मध्यान्होत्तर महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ चा नियम ६६ (१) अन्वये स्वेच्छा सेवानिवृत्त करणेस मान्यता देण्यात येत आहे. तसेच श्रीमती अंबा अर्जुन लाड यांना स्वेच्छा सेवानिवृत्तीनंतर दयावयाचे अनुषंगिक लाभ अदा करणेस आजची ही सभा आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे.<br>अनुमोदक :- (नरेंद्र पाटील) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजूर |
| ५. | वसई विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती-सी, चंदनसार आस्थापनेवरील कर्मचारी श्री. नगीन शांतू लाड, सफाई कामगार यांना स्वेच्छा निवृत्ती देणेबाबत. | ठराव/निर्णय :- वसई विरार शहर महानगरपालिकेतील कर्मचारी श्री. नगीन शांतु लाड, सफाई कामगार, प्रभाग समिती- सी, चंदनसार यांना दि. ३१/०१/२०१९ रोजी मध्यान्होत्तर महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ चा नियम ६६ (१) अन्वये स्वेच्छा सेवानिवृत्त करणेस मान्यता देण्यात येत आहे. तसेच श्री. नगीन शांतु लाड यांना स्वेच्छा सेवानिवृत्तीनंतर दयावयाचे अनुषंगिक लाभ अदा करणेस आजची ही सभा आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे.<br>अनुमोदक :- (नरेंद्र पाटील) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजूर |

| | | |
|---|---|---|
| ६. | वसई विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती-सी, चंदनसार आस्थापनेवरील कर्मचारी श्री.अविनाश पु. पारेख, वरिष्ठ लिपीक यांना स्वेच्छा सेवानिवृत्ती देणेबाबत. | ठराव/निर्णय :- वसई-विरार शहर महानगरपालिकेतील कर्मचारी श्री. अविनाश पुरषोत्तम पारेख, वरिष्ठ लिपीक, प्रभाग सी, चंदनसार यांना दि. ३१/०१/२०१९ रोजी मध्यान्होत्तर महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ नियम ६६ (१) अन्वये स्वेच्छा सेवानिवृत्त करणेस मान्यता देण्यात येत आहे . श्री. अविनाश पुरषोत्तम पारेख, वरिष्ठ लिपीक, यांना स्वेच्छा निवृत्ती नंतर द्यावयाचा अनुषंगिक लाभ अदा करणेस आजची ही सभा आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- (नरेंद्र पाटील) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ७. | श्री. विनोद मोहन गोयल यांची वारसाहक्काने सफाई कामगार या पदावर नियुक्ती करणेबाबत. | ठराव/निर्णय :- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती - ए, बोळींज येथील कर्मचारी श्री. मोहन उल्का गोयल, सफाई कामगार हे दिनांक ३१/०५/२०१८ रोजी महानगरपालिका सेवेतून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेले असुन त्यांचा मुलगा श्री. विनोद मोहन गोयल (वय २५ वर्षे, १ महिने) यांना सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचेकडील शासन परिपत्रक दिनांक २१ ऑक्टोबर, २०११, शासन परिपत्रक दिनांक २६ फेब्रुवारी, २०१४ व शासन निर्णय दिनांक ११ मार्च, २०१६ मधील तरतुदीनुसार वारसाहक्क नियुक्तीसाठी पात्र असल्याने त्यांना लाड समितीच्या शिफारसीनुसार वारस हक्काने महानगरपालिका सेवेत "सफाई कामगार" या पदावर सामावुन घेणेस आजची ही महासभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- (सखाराम महाडीक) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ८. | श्री. निंबा पवार, वरिष्ठ लिपीक, यांचे प्रकरणी विभागीय चौकशी अधिकाऱ्याने दिलेल्या अहवालावर निर्णय घेणेबाबत. | निर्णय/ठराव:- श्री. निंबा पवार, वरिष्ठ लिपीक, नवघर-माणिकपूर (सेवानिवृत्त) अपचारी यांचा विभागीय चौकशी अधिकाऱ्याने ते निर्दोष असल्याचा अहवाल दिला आहे. अशा परिस्थितीत चौकशी अधिकाऱ्याचा अहवाल मान्य करण्यात येऊन अपचारी श्री. निंबा पवार यांना दोषमुक्त करण्याचा निर्णय ही मा. महासभा घेत आहे. प्रशासनाने त्यानुसार आवश्यकती नियमानुसार पुढील कार्यवाही करावी, असा निर्देशही मा. महासभा देत आहे.<br>**अनुमोदक :- (नितीन राऊत) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ९. | श्री. अरविंद नाईक, वरिष्ठ लिपीक, नालासोपारा यांचे प्रकरणी विभागीय चौकशी अधिकाऱ्याने दिलेल्या | श्री. अरविंद नाईक, लिपीक, नालासोपारा यांना चौकशीच्या अधिन राहून दि. ०६/०४/२०१७ च्या आदेशान्वये सेवेत पुन:स्थापीत करण्यात आले आहे. अपचारी श्री. अरविंद नाईक यांचा विभागीय चौकशी अधिकाऱ्याने ते निर्दोष असल्याचा अहवाल दिला आहे. अशा परिस्थितीत चौकशी अधिकाऱ्याचा अहवाल मान्य करण्यात येऊन अपचारी श्री. अरविंद नाईक यांना दोषमुक्त करण्याचा |

| | | |
|---|---|---|
| | अहवालावर निर्णय घेणेबाबत. | निर्णय ही मा. महासभा घेत आहे. प्रशासनाने त्यानुसार आवश्यकती नियमानुसार पुढील कार्यवाही करावी, असा निर्देशही मा. महासभा देत आहे.<br>अनुमोदक :- (निलेश देशमुख) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |
| १०. | श्री. विजय पाटील, लिपीक, नालासोपारा यांचे प्रकरणी विभागीय चौकशी अधिकाऱ्याने दिलेल्या अहवालावर निर्णय घेणेबाबत. | निर्णय/ठराव:- श्री. विजय पाटील, लिपीक, नालासोपारा यांना चौकशीच्या अधिन राहून दि. ०६/०४/२०१७ च्या आदेशान्वये सेवेत पुन:स्थापीत करण्यात आले आहे. अपचारी श्री. विजय पाटील यांचा विभागीय चौकशी अधिकाऱ्याने ते निर्दोष असल्याचा अहवाल दिला आहे. अशा परिस्थितीत चौकशी अधिकाऱ्याचा अहवाल मान्य करण्यात येऊन अपचारी श्री. विजय पाटील यांना दोषमुक्त करण्याचा निर्णय ही मा. महासभा घेत आहे. प्रशासनाने त्यानुसार आवश्यकती नियमानुसार पुढील कार्यवाही करावी, असा निर्देशही मा. महासभा देत आहे.<br>अनुमोदक :- (चंद्रकांत जाधव) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजूर |
| ११. | वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती जी मधील वॉर्ड नं.८८ मध्ये विविध ठिकाणी पाईप गटार, पेव्हर ब्लॉक बसविणे व स्लॅब दुरुस्त करणेचे कामाचे अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत. | ठराव:- वरील प्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त रक्कम रु.८५,१६,६२४/- कामी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यात येत आहे तसेच पुढील निविदा कार्यवाहीस मान्यता देण्यात येत आहे.<br>अनुमोदक :- (कन्हैय्या भोईर) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |
| १२. | प्रभाग समिती अ मधील विरार (प.) प्रभाग क्र.३ मध्ये भवानी मंदीर ते मारंबळपाडा जेट्टी पर्यंत रस्त्याचे रुंदीकरण करणे याकामी प्रशासकिय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत. | ठराव/निर्णय :- सदर कामी होणाऱ्या अंदाजपत्रकीय रक्कम (रु.३,१२,७४,२६६/-) या खर्चास ही सभा प्रशासकिय व वित्तीय मान्यता देत आहे व सदर कामी ई-निविदा दर मागविण्यात यावेत असे ही सभा ठरविते.<br>अनुमोदक :- (सखाराम महाडीक) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |
| १३. | प्रभाग समिती जी मधील वॉर्ड नं.८९ मध्ये कामण येथे स्मशानभुमी जागेस संरक्षक भिंत बांधणे व जागेचे सुशोभिकरण करणे कामाचे | ठराव :- वरील प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. सदर कामाच्या रक्कम रु. १,७२,४३,४४७/- च्या अंदाजपत्रकास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहे. हयाकामी निविदा दर मागविण्यात यावे असे ही सभा ठरवित आहे.<br>अनुमोदक :- (कन्हैय्या भोईर) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |

| | | |
|---|---|---|
| | अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत. | |
| १४. | प्रभाग समिती जी मधील वॉर्ड नं. ७४ मध्ये धुमाळनगर येथील अरिहंत इंड. नं.२ ते बाप्पा सिताराम पर्यंत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे कामाचे अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत. | ठराव/निर्णय :- वरिलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त नमुद कामी होणाऱ्या खर्चास प्रशासकिय व वित्तीय मंजूरी देण्यात येत आहे तसेच पुढील निविदा कार्यवाहीस मान्यता देण्यात येत आहे.<br>अनुमोदक :- (कन्हैय्या भोईर) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |
| १५ | प्रभाग समिती जी कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती जी मधील वॉर्ड नं. ७५ मध्ये सातीवली येथील शिवम इंड. ते नंदा इंडस्ट्रीयल सोसा. पर्यंत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणेचे कामाचे अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत. | ठराव /निर्णयः- वरिलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त नमुद कामी होणाऱ्या रक्कम रु.१,१८,४६,०३०/-च्या खर्चास प्रशासकिय व वित्तीय मंजूरी देण्यात येत आहे तसेच पुढील निविदा कार्यवाहीस मान्यता देण्यात येत आहे.<br>अनुमोदक :- (कन्हैय्या भोईर) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |
| १६. | महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामावर आकारावयाच्या शास्तीबाबत. | ठराव/निर्णय :- सभागृहात निर्णयासाठी सादर केलेल्या उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा करण्यात आली शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र-३०५/नवि-२० दिनांक-११/०१/२०१७ नुसार खालीलप्रमाणे शास्तीची आकारणी करण्याचे निर्देश आहेत. |

| अ.क्र | निवासी बांधकामाचे क्षेत्रफळ | आकारवयाचे शास्तीचे दर |
|---|---|---|
| १. | ६०० चौ.फुटापर्यतचे निवासी बांधकाम | शास्तीची आकारणी करण्यांत येऊ नये |
| २. | ६०० ते १००० चौ. फुटापर्यतचे निवासी बांधकाम | प्रतिवर्षी मालमत्ता कराच्या ५०% दराने शास्ती आकारण्यात यावी. |
| ३. | १००१ चौ. फुटापुढील निवासी बांधकाम | प्रतिवर्षी मालमत्ता कराच्या दुप्पट दराने शास्ती आकारण्यात यावी. (सध्याच्या दराने) |

उपरोक्त शासन निर्णयाची पुर्वलक्षी प्रभावाने अंमलबजावणीमुळे महानगरपालिकेला येणारी आर्थिक तुट विचारात घेता सदर

| | | |
|---|---|---|
| | | निर्णयाची अंमलबजावणी सन २०१९-२०२० पासुन करण्याबाबत प्रस्तावित आहे.सबब वर नमुद दराने शास्तीची आकारणी सन २०१९-२०२० या वित्तीय वर्षापासुन करण्यास आजची सभा एकमताने मंजुरी प्रदान करीत आहे.<br>अनुमोदक :- (पंकज चोरघे) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| १७. | **वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती ए कार्यालय अंतर्गत येणाऱ्या उमराळे येथे नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र सुरु करणेकामी या कामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.** | **ठराव / निर्णय :-** वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती 'ए' कार्यालय अंतर्गत येणाऱ्या उमराळे येथे नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र सुरु करणे व याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत सभागृहात सविस्तर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यात आला की, महानगरपालिकेच्या प्रभाग समिती 'ए' कार्यक्षेत्रातील उमराळे, नालासोपारा (प.) येथिल परिसरात नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र सुरु करणेस ही सभा मंजूरी देत आहे. तसेच नव्याने सुरु करण्यांत येणाऱ्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये आवश्यक असणारी वरील नमूद बाबींची व्यवस्था उपलब्ध करणे कामी येणाऱ्या संपूर्ण खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>अनुमोदक :- (राजेंद्र कांबळी) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| १८. | **वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती सी कार्यालय अंतर्गत येणाऱ्या नारींगी येथे माता बाल संगोपन केंद्र सुरु करणेकामी व या कामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.** | **ठराव / निर्णय :-** वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील नारिंगी हे क्षेत्र प्रभाग समिती 'ए' मध्ये येत असून प्रभाग समिती 'ए' कार्यालय अंतर्गत येणाऱ्या नारिंगी येथे माता बाल संगोपन केंद्र सुरु करणे व याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत सभागृहात सविस्तर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यात आला की, महानगरपालिकेच्या प्रभाग समिती 'ए' कार्यक्षेत्रातील नारिंगी, विरार (पूर्व) येथिल परिसरात माताबाल संगापन केंद्र सुरु करणेस ही सभा मंजूरी देत आहे. तसेच नव्याने सुरु करण्यांत येणाऱ्या माताबाल संगोपन केंद्रामध्ये आवश्यक असणारी वरील नमूद बाबींची व्यवस्था उपलब्ध करणे कामी येणाऱ्या संपूर्ण खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>अनुमोदक :- (राजेंद्र कांबळी) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| १९. | **वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कंत्राटी B.A.M.S. अर्हताधारक वैद्यकीय अधिकारी यांना वेतन गट अ संवर्गातील वैद्यकीय अधिकारी यांची वेतनश्रेणी लागू करणेबाबत.** | **ठराव/निर्णय :-** वसई - विरार शहर महानगरपालिकेच्या कंत्राटी बी.ए.एम.एस.अर्हताधारक वैद्यकीय अधिकारी यांना वेतन गट - अ संवर्गातील वैद्यकीय अधिकारी यांची वेतनश्रेणी लागु करणेबाबत सभागृहात सविस्तर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यात आला की, महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागांतर्गत कंत्राटी तत्वावर कार्यरत बी.ए.एम.एस.अर्हताधारक वैद्यकीय अधिकारी यांना महाराष्ट्र वैद्यकीय आरोग्य सेवा वेतन गट - अ संवर्गातील वैद्यकीय अधिकारी यांची वेतनश्रेणी लागु करणेबाबतच्या विषयांवर मा. वैद्यकीय सहाय्य व आरोग्य समिती सभेपुढे सविस्तर चर्चा होऊन पुनश्च: सदरचा प्रस्ताव सभागृहासमोर सादर करण्यांत यावा. तुर्त सदरचा प्रस्ताव तहकूब करणेंत येत आहे.<br>अनुमोदक :- (राजेंद्र कांबळी) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |

| | | |
|---|---|---|
| २०. | **बरफपाडा, देवीचापाडा,रायपाडा, कुंभारपाडा या वन विभागातील गावांना महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांचे कडून वीजेचे खांब टाकून वीज देण्यासंबंधी वन विभाग मांडवी, विरार (पूर्व) यांना अनुमती देणेबाबत.** | **प्रस्तावाचा निर्णय :-** सदर प्रस्तावाचे सभागृहात वाचन करुन असा निर्णय घेण्यात आला की, बरफपाडा, देवीचापाडा, रायपाडा,कुंभारपाडा या वन विभागातील गावांना केंद्र शासन व राज्यशासन पुरस्कृत दिन दयाळ उपाध्याय ग्रामज्योत योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादिततर्फे वीजेचे खांब टाकुन वीज देणेबाबत महापालिकेची कोणतीही हरककत नाही. तसेच या ठरावाची प्रत वनविभाग मांडवी, विरार (पुर्व) यांना पुढील योग्य त्या कार्यवही करीता देणेत यावी. यास सभेने एकमताने मंजूरी दिली.<br>अनुमोदक :- (दिलीप गोवारी) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| २१ | **वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील मौजे-उमेळा येथील सर्वे नं.-१२४ व इतर मधिल जागेवर खेळाच्या मैदानाचे नव्याने आरक्षण प्रस्तावित करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये करावयाच्या कार्यवाहीबाबत.** | ठराव /निर्णय :- याकामी मंजूर विकास आराखडयामध्ये (नकाशा क्र.०१/२०१८-१९ मध्ये दर्शविल्याप्रमाणे ) सध्या असलेल्या आखणीमध्ये बदल करणेंस महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये खेळावे मैदान आरक्षण क्र. ८७७ आणि खेळाचे मैदान आरक्षण क्र८७८ अशी दोन नवीन आरक्षणे प्रस्तावित करणेची कार्यवाही करणेंस मान्यता देण्यात येत आहे व याकामी येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यांत येत आहे. याकामी उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार पुढील कार्यवाही करणेंत यावी.वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील मौजे-उमेळे येथील स.नं.१२४ आणि लगतचे मौजे-उमेळमान येथील स.नं.१०९ जागेमधील (नकाशा क्र.०१/२०१८-१९ मध्ये दर्शविल्याप्रमाणे ) मंजूर विकास आराखडयात नव्याने खेळाचे मैदान आरक्षण क्र.८७७ (एकुण क्षेत्र - ३३८४४.०० चौ.मी) आणि खेळाचे मैदान आरक्षण क्र.८७८ (एकुण क्षेत्र - ८१०९७.०० चौ.मी) जागा आरक्षित करणे व त्यास अनुक्रमे आरक्षण क्र.८७७ आणि आरक्षण क्र.८७८ देणे व सदर जागा भुसंपादन व अंमलबजावणी करणेंसाठी समुचित प्राधिकरण म्हणुन वसई-विरार शहर महानगरपालिका करणेत यावी. वरील प्रस्तावानुसार ३७(१) अन्वये कार्यवाही करणेस आजची ही सभा मंजूरी देत आहे.<br>अनुमोदक :- (सचिन घरत) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| २२. | **वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रथम महिला महापौर श्रीमती प्रविणताई ठाकूर यांच्या सतत प्रयत्न व पाठपुराव्यानुसार महानगरपालिलकेची रुग्णालये, माता बालसंगोपन केंद्रे,** | ठराव / निर्णय :- वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सभागृहात सविस्तर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यात आला की, शहरामध्ये नागरीकांना विविध गंभीर आजारांवर उपचार करणेकामी आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागते. अशा नागरीकांना महानगरपालिकेच्या रुग्णालये, माताबाल संगोपन केंद्रे, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे व दवाखाने याठिकाणी उपचार करुन घेणे सोईचे व्हावे याकरीता महानगरपालिकेच्या प्रथम महिला महापौर श्रीमती. प्रवीणाताई ठाकूर यांनी कार्यक्षेत्रातील |

| | | |
|---|---|---|
| | नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे व दवाखाने येथे सध्यस्थितीत विवीध ठरावाचे रुग्णांकडून आकारण्यात येणारी फी रद्द करुन संपूर्ण वैद्यकीय सेवा विनामुल्य देणेकामी प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत | नागरीकांना विनामुल्य वैद्यकीय सेवा मिळणेकामी सतत प्रयत्न व पाठपुरावा केला आहे. तसेच वैद्यकीय आरोग्य ही उत्पन्नाची बाब नसून सेवेचे काम असल्याने महानगरपालिकेने केलेल्या विविध ठरावान्वये रुग्णांकडुन आकारण्यात येणारी फी रद्द करुनकार्यक्षेत्रातील नागरिकांना उपचारासाठी महानगरपालिकेचे रुग्णालये, माताबाल संगोपन केंद्रे, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे व दवाखाने यामार्फत रोगनिदान, तपासणी, शस्त्रक्रिया व उपचार मोफत देणेस ही महासभा मान्यता देत आहे.<br><br>अनुमोदक :- (भारती देशमुख) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |

नगरसचिव

वसई विरार शहर महानगरपालिका